# Karmaveer Mamasaheb Jagdale Mahavidyalaya Washi

Complaints/Suggestion regarding Internal Examination

1. Name of the student:

2. Class:

Roll no.:

College registration no.:

3. Name of the examination:

4. Subject:

5. Name of the Paper:

6. Date of Examination:

7. Complaints/suggestions (Give details):

____________________________________________________

____________________________________________________

____________________________________________________

Date : Signature

Note: This form should be submitted to Examination section of the college.

K.M.J.M. Washi Tq.Washi Dist.Osmanabad

PRINCIPAL
KARMAVEER MAMASAHEB JAGDALE
MAHAVIDYALAYA WASHI

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र(भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२२/ 2180

दिनांक : २७.०६.२०२२

## परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषय : परीक्षा शुल्काचे Mandate Reconcile करुन विवरण पत्र विद्यापीठास सादर करणेबावत.
संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. परीक्षा/समन्वय/निर्धारित वेळापत्रक/२०२१-२२/१३८३,
दि. २४.०९.२०२१

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भिय निर्धारित वेळापत्रकाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल-२०२२ च्या जुन/जुलै-२०२२ मध्ये झालेल्या व होत असलेल्या परीक्षांचे परीक्षा शुल्क भरल्याचे विवरण पत्र सादर करण्यासाठी वेळोवेळी परिपत्रकानुसार सुचित करण्यात आलेले आहे परंतु या कार्यालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अद्यापर्यंत अनेक महाविद्यालये/परिसंस्थांनी परीक्षा शुल्क भरल्याचे विवरण पत्र सादर केलेले नाही.

तसेच ज्या महाविद्यालय/परिसंस्थांनी अद्याप पर्यंत परीक्षा शुल्काचे प्रलंबित असलेले Mandate Reconcile करुन त्याचे विवरण पत्र विद्यापीठास सादर केलेले नाही अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी आपल्या लॉगिन मध्ये पडताळणी करुन तात्काळ Mandate Reconcile करुन त्याचे विवरण पत्र विद्यापीठास सादर करावे.

करिता, उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करुन परीक्षा शुल्क भरल्याचे विवरण पत्र प्रचलित पध्दतीप्रमाणे प्राचार्य/संचालक यांच्याकडून प्रमाणित करुन **मंगळवार, दि. ०५.०७.२०२२** पर्यंत समन्वय कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांना सादर करण्यात यावे. ही विनंती.

जे महाविद्यालय/परिसंस्था उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणार नाहीत त्यांच्या बाबत पुढील प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

सदर पत्र विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिद्ध करण्यात आले आहे.

K.M.J.M. Washi Tq.Washi Dist Osmanabad

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

F:\CO-ORDINATION UNIT DATA\NEW DOCUMENTS MEE 2019\Note & Letters\MARATHI LETTER_2021_22.docx

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-accredited A Grade

Telephone : (0240) 2403200
Office PBX : (0240) 2403399/400
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
*नॅक समितीतर्फे अ दर्जा प्राप्त*

**Office : Director, Board of Examination & Evaluation**
कार्यालय : संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ

संदर्भ क्र.: परीक्षा/ २०२२/ 1724

दिनांक : २६.०४.२०२२ 28

**काळमर्यादा**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय:** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील मार्च/एप्रिल २०२२ च्या जून/जुलै २०२२ मध्ये होणाऱ्या द्वितीय सत्र (Second Term End Examination) परीक्षेसाठीचे आवेदनपत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेणेबाबत.

**संदर्भ:** १. शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मधील परीक्षांचे निर्धारित वेळापत्रक दि.२४/०९/२०२१
२. प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे दिनांक २७.०४.२०२२ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी व संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील मार्च/एप्रिल २०२२ च्या जून/जुलै २०२२ मध्ये होणाऱ्या द्वितीय सत्र (Second Term End Examination) परीक्षेची प्रारंभ तारीख संदर्भीय पत्रन्वये पदवीसाठी दिनांक २१.०६.२०२२ व पदव्युत्तरसाठी दिनांक ०५.०७.२०२२ ह्या तारखा निश्चित करण्यात आल्या होत्या. तसेच वरील परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र भरुन घेण्यासाठीची तारीख ६.४.२०२२ पासून ते १८.०५.२०२२ पर्यंत देण्यात आली होती.

परंतु दिनांक २५.०४.२०२२ रोजी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी राज्यातील सर्व कुलगुरु यांचे सोबत ऑनलाईन बैठक घेवून मार्च/एप्रिल २०२२ मधील सर्व परीक्षा ह्या ऑफलाईन पध्दतीने (पुर्वीप्रमाणे लेखी पध्दतीने) १ जुन २०२२ ते १५ जुलै २०२२ पर्यंत घेण्यात याव्यात, अशा सूचना दिल्या आहेत. त्यानुसार मा.कुलगुरु महोदय यांचे आदेशानुसार पदवी परीक्षा दि.०१.०६.२०२२ व पदव्युत्तर परीक्षा दि.२१.०६.२०२२ पासून घेण्यात येणार आहेत. त्यामुळे मार्च/एप्रिल २०२२ च्या जुन २०२२ मध्ये होणाऱ्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठीचे सर्व पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुण देण्यात आले आहेत. त्यादृष्टीने सर्व संबंधीत विद्यार्थी, अध्यापक, कर्मचारी व पालक यांना याबाबत सूचना देवून सर्व पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र विहित मुदतीच्या आत भरुन घेण्यात यावे, ही विनंती.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Examinations Aurangabad

K.M.J.M. Washi Tq.Washi Dist.Osmanabad

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

D:\Gangurde\CIRCULAR 2019_Coordination Unit_Exam.doc

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

# परिपत्रक

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य / परिसंस्थांचे संचालक व सर्व संबंधीत विद्यार्थी यांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२१ च्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सर्व विषयांची परीक्षा ह्या दिनांक २९ जुलै २०२१ पासून घेण्यात आलेल्या आहेत. काही तांत्रिक कारणामुळे काही विद्यार्थ्यांना Login करता आले नाहीत. तसेच Online प्रश्नपत्रिका मिळाल्या नाहीत. यामुळे काही विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही. या कारणास्तव **ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा देता आली नाही फक्त अशाच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून मा.कुलगुरु महोदय यांनी यापुर्वी झालेल्या विषयाच्या फक्त Online पध्दतीने पुन्हा परीक्षा घेण्याबाबत आदेश दिले आहेत.** त्याप्रमाणे यापुर्वी झालेल्या कालावधीतील परीक्षा ह्या खालील नमूद वेळापत्रकाप्रमाणे व तारखेप्रमाणे पुनःश्च परीक्षा घेण्याचे ठरविले आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | यापुर्वी झालेल्या परीक्षेचा कालावधी | पुर्नपरीक्षेची नविन तारीख | परीक्षेची वेळ |
|---|---|---|---|---|
| ०१ | सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे सर्व विषय | ०८.०९.२०२१ ते २३.०९.२०२१ | ३०.०९.२०२१ | सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०८.०० वाजेपर्यंत |

सदर परीक्षा ही फक्त Online माध्यमातून घेण्यात येत असून Online परीक्षा ही सकाळी ०९ ते सायंकाळी ०८ या वेळेत होईल. याची नोंद घ्यावी. **ज्या विद्यार्थ्यांनी यापुर्वी परीक्षा दिली आहे, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा परीक्षा देवू नये, जे विद्यार्थी अशा प्रकारे दोन वेळा परीक्षा देतील, त्यांचे निकाल घोषित केले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.** तसेच सर्व संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, यानंतर अशा प्रकारे पुर्नपरीक्षा घेण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी. परीक्षा सुरळीत होणाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना तशा सूचना द्याव्यात व एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची संबंधीतांनी दक्षता घ्यावी, ही विनंती.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिध्द करण्यात आले आहे.

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद )(
संदर्भ.क्र.: परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२१/ १३७९ )(
दिनांक : २७.०९.२०२१ )(

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव

१. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांना सदरचे परिपत्रक प्रसिध्दीस्तव देण्यात येत आहे.
२. सर्व कक्ष प्रमुख, परीक्षा विभाग
३. समन्वयक, ई-सुविधा, परीक्षा विभाग

K.M.J.M. Washi Tq.Washi Dist.Osmanabad

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Aurangabad-431 004 Maharashtra, India
NAAC Re-acredited 'A' Grade
Examinations & Evaluation Section

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४३१००४ महाराष्ट्र, भारत
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त
परीक्षा व मूल्यमापन विभाग

Office PBX : (0240) 2403399/400
B.E.E. (0240)2403200
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.in
E-Mail : coe@bamu.ac.in

संदर्भ क्र: परिक्षा/प्रात्यक्षिक परीक्षा/बी.सीएस कक्ष/२०२२/ दिनांक ०३.०१.२०२२

**"प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक"**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत विज्ञान महाविद्यालये,
बी.एस्सी (संगणक शास्त्र, ईनफॉमेशन टेक्नॉलॉजी,
बायोटेक्नॉलॉजी) ई., बी.सी. ए (सायन्स) ई.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

विषयः- ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२१ च्या जानेवारी/फेब्रुवारी-२०२२ मध्ये होणाऱ्या बी.एस्सी (संगणक शास्त्र,ईनफॉमेशन टेक्नॉलॉजी, बांयोटेक्नॉलॉजी, हॉटेल ऑपरेशन आणि केटरिंग सर्व्हिस, नॉन कन्व्हेंशनल आणि कन्व्हेशनल एनर्जी ) ई., बी.सी.ए (सायन्स) इत्यादी सर्व विषयाच्या प्रथम, व्दितीय, तृत्तीय,चतुर्थ, पाचवे व सहावे (I To VI) सत्राच्या अतंर्गत व प्रात्यक्षिक परीक्षा वेळापत्रकानुसार ऑनलाईन (Online) घेणे बाबत.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या आनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **कोव्हीड-१९ च्या प्रादुर्भावामुळे शासनाने जे निर्बधन घालुन दिलेले आहेत. त्या निर्बध व मार्गदर्शक सुचनाच्या अनुषंगाने** ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२१ च्या जानेवारी/फेब्रुवारी-२०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या बी.एस्सी (संगणक शास्त्र,ईनफॉमेशन टेक्नॉलॉजी, बांयोटेक्नॉलॉजी, हॉटेल ऑपरेशन आणि केटरिंग सर्व्हिस, नॉन कन्व्हेंशनल आणि कन्व्हेशनल एनर्जी) ई., बी.सी.ए (सायन्स) इत्यादी विज्ञान विद्या शाखेतील प्रथम, व्दितीय, तृत्तीय,चतुर्थ, पाचवे व सहावे (I To VI) सत्राच्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन (Online) प्रात्याक्षीक परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी खालील मार्गदर्शक मुद्याचे पालन करुन दिनांक २४.०१.२०२२ ते ०५.०२.२०२२ या कालावधीमध्ये आपल्या महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येऊन पुर्ण कराव्यात. तसेच गुणांची (Data Entry) डाटा ईंट्री करुन त्वरीत अपलोड करुन प्रिंट काढुन हार्ड कॉपी फाईल करुन विद्यापीठामध्ये (०३) तीन दिवसाच्या आत सादर करण्यात याव्यात.

| अ.क्र | कोर्सचे नांव | प्रात्यक्षिक परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| ०१ | B.Sc (Comp.Sci., I.T., Bio-Tec., Bio-Infor., For.Sci., Home Sci., Net.& Mult., Auto.Tech., Work.Tech., Animation., Refr. & Air Condition., Hardware Netw., Hotel Opration & Catering services, Non Conventional & Conventional Energy ) & B.C.A. (Sci.) | **दिनांक २४.०१.२०२२ ते ०५.०२.२०२२ या कालावधीत प्रात्यक्षीक परीक्षा घेण्यात याव्यात.** |

**महत्वाची सुचनाः-** बी.एस्सी (संगणक शास्त्र,ईनफॉमेशन टेक्नॉलॉजी, बांयोटेक्नॉलॉजी, हॉटेल ऑपरेशन आणि केटरिंग सर्व्हिस, नॉन कन्व्हेशनल आणि कन्व्हेशनल एनर्जी ) ई., बी.सी.ए (सायन्स) इत्यादी प्रथम, व्दितीय, तृत्तीय,चतुर्थ, पाचवे व सहावे (I To VI) सत्राच्या प्रात्येक्षीक परीक्षेच्या गुणयाद्या बाबत प्रस्तुत पत्रातील अनु. क्र. ०१ ते १२ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१.बी.एस्सी (संगणक शास्त्र,ईनफॉमेशन टेक्नॉलॉजी, बांयोटेक्नॉलॉजी, हॉटेल ऑपरेशन आणि केटरिंग सर्व्हिस, नॉन कन्व्हेशनल आणि कन्व्हेशनल एनर्जी ) ई., बी.सी.ए (सायन्स) इत्यादी प्रथम, व्दितीय, तृत्तीय,चतुर्थ, पाचवे व सहावे सत्राचे वार्षीक प्रात्येक्षीक परीक्षेसाठी बाहय परीक्षक External अनिवार्य आहे. बाहय परीक्षक हजर नसल्यास महाविद्यालयातील तंज्ञास बहिस्थ परीक्षक म्हणून नियक्त करुन प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात याव्यात.

२.बाहय परीक्षकांची यादी ४८३ (ब) समिती कडुन प्राप्त झाल्याप्रमाणे विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

३.बाहय परीक्षकांच्या यादीतील परीक्षकास संपर्क साधून त्यांना सबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रात्यक्षिक परीक्षक म्हणुन नियुक्ती पत्र देऊन त्यांच्या उपस्थीतीत परीक्षा घेण्यात याव्यात.

४.परीक्षेचे वेळापत्रक तुकडया (बॅचेस) हे विषय Combination नुसार विद्यापीठाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे तयार करावे आणि विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांच्या सूचना फलकावर लावावेत.

K.M.J.M. Washi Tq.Washi Dist.

**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad-431 004 Maharashtra, India
**NAAC Re-acredited 'A' Grade**
Examinations & Evaluation Section

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**४३१००४ महाराष्ट्र, भारत**
नॅक समिती तर्फे 'अ' दर्जा प्राप्त
परीक्षा व मूल्यमापन विभाग

Office PBX (0240) 2403399/400
B F E (0240)2403200
Web Site www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.in
E-Mail coe@bamu.ac.in

५.प्राचार्यांनी शक्य तो आपल्याच महाविद्यालयातील अद्यापकाची बाहय परीक्षक म्हणुन नेमणुक करावी. तसे न जमल्यास आपल्या जिल्हयामधीलच परीक्षकांना नेमणुक द्यावी. जर सदर यादीतील परीक्षक उपलब्ध नसल्यास जवळच्या जिल्हयातील परीक्षकांची नेमणुक करण्यात यावी.

६.बी.एस्सी (सगंणक शास्त्र,इंनफॉमेशन टेक्नॉलॉजी, बायोटेक्नॉलॉजी, इं., बी.सी.ए (सायन्स) इत्यादी सर्व विषयाच्या (College ssessment/Practical/Disseration/Oral/Viva-Voce ) (परीक्षेसाठी विद्यापीठामार्फत पदवी/पदव्युत्तर स्थरावर परीक्षक नेमण्यात येतात. सदरील परीक्षकांचे प्रवास भत्ता व दैनंदिन भत्याचे (TA/DA) हा सबंधीत महाविद्यालयामार्फत नियमानुसार देण्यात यावा. हा खर्च महाविद्यालयास परीक्षेसाठी देण्यात येणाऱ्या अग्रीम रक्कमेतुन करण्यात यावा.

७.सर्व विषयांच्या प्रात्यांक्षिक परीक्षेच्या गुण याद्या बंद लिफाफयावर परीक्षेचे नांव, बॅचेस,वर्ग विषयाचे नाव, पेपरचे नाव, केंद्राचे नाव, तसेच परीक्षकांच्या स्वाक्षरीसहीत पुर्ण नाव व महाविद्यालयाचे नाव नमुद करुन सत्रानुसार बंद लिफाफयात एकत्रित सिल करुन प्रस्तुत महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे जमा करुन घेण्यात याव्यात, तदनंतर प्राचार्यांनी त्यांच्या समक्ष बंद लिफाफयातील गुणयाद्या खुल्या करुन (Data Entry ) डाटा इंट्री करीता महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्याकडे त्वरीत उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

८.सर्व विषयाच्या प्रात्यांक्षिक परीक्षेचे गुण याद्या (Data Entry ) डाटा ईन्ट्री करुन अपलोड करण्यात यावे आणि गुणांची प्रिंटेड हार्ड कॉपी सदरील परीक्षांकाच्या स्वाक्षरीसहीत पुर्ण नाव व महाविद्यालयाचे नांव नमुद करुन फाईलमध्ये महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मार्फत प्रात्यक्षीक परीक्षा संपल्यानंतर (०३) तीन दिवसाच्या आत पाठविण्याची जबाबदारी संबधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

९.बी.एस्सी (सगंणक शास्त्र,इंनफॉमेशन टेक्नॉलॉजी, बॉयोटेक्नॉलॉजी,) इं., बी.सी.ए (सायन्स) इत्यांदी प्रथम वर्ष, व्दितीय वर्ष व तृत्तीय वर्ष (सत्र पध्दत) प्रात्यांक्षिक परीक्षेच्या गुणयाद्या ADES Assessment Data Export File वर (Data Entry) करुन (www.bamu.digititaluniversity.ac) या संकेत स्थवर Result Data निकाल घोषित करण्याकरीता उपलब्धत झाल्याबाबतची खात्री करुन (Data Entry) डेटा इन्ट्री अपलोड करुन सिंक्रुनाईजेशन करुन सगंणक कक्षात शहानिशा करावी, तदनंतर हार्ड कॉपी (Hard Copy) ची प्रिंट संबंधीत परीक्षक नियामक व प्राचार्य संचालक यांचे स्वाक्षरीसह (एम.के.सी.एल) च्या संकेतस्थवरुन http:/bamua.digitaluniversity.ac/postexamination) publish Data for ERPS publish Student-paper marks for ERPS---show exported Students paper Data हया लिंक वरुन महाविद्यालयाने सर्व विद्यालयाने सर्व विद्यार्थ्यांचा <u>डेटा अपलोड करुन सिंक्रुनाईजेशन झाल्याबाबतचा रिपोर्ट</u> प्राचार्य/संचालक यांच्या स्वाक्षरींसह आवश्य सादर करणे.(०३) तीन दिवसात परीक्षा विभागातील सबंधीत कक्षामध्ये पाठवून त्याची पोच घ्यावी.

१०.प्राचार्यांनी विद्यापीठ परवानगी शिवाय परीक्षार्थींना प्रात्यक्षिक परीक्षेकरीता इतर महाविद्यालयात out of Turn पाठवु नये.

११.बी.एस्सी (सगंणक शास्त्र,इंनफॉमेशन टेक्नॉलॉजी, बॉयोटेक्नॉलॉजी,) इं., बी.सी.ए इत्यादी प्रथम, व्दितीय, तृत्तीय,चतुर्थ, पाचवे व सहावे (I To VI) सत्राच्या (Practical) प्रात्यांक्षिक परीक्षेच्या गुणांची (Data Entry) डेटा इन्ट्री करुन (www.bamu.digititaluniversity.ac) या सकेंत स्थळावर (Practical) प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुण याद्या सोबत (College Assisment Sessional Work) परीक्षेच्या गुणयाद्या या फाईलमध्ये कार्यालयास सादर करण्यात यावाव्यात.

१२.पी.आर.एन.नंबरने प्रात्येक्षीक परीक्षा घेण्यास हरकत नाही परंतु पी.आर.एन.नबंर समोर परीक्षा क्रमांक लिहीणे आवश्यक राहील.

टिपः- सदरील पत्र विद्यापीठाच्या www.bamu.digititaluniversity.ac ;संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

K.M.J.M. Washi Tq.Washi Dist.Osmanabad

D:\Gangurde\CIRCULAR 2019_Coordination Unit_Exam.doc

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

परीक्षा व मूल्यमापन विभाग

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / परिसंस्थांचे संचालक यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील प्रथम सत्र (First Term End Examination) मार्च/एप्रिल २०२१ व द्वितीय सत्र (Second Term Examination) जुलै/ऑगस्ट २०२१ मध्ये होणाऱ्या विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यापीठ सत्र परीक्षांसाठी निर्धारित वेळापत्रक व परीक्षा शुल्काचे विवरण विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. मार्च/एप्रिल २०२१ च्या जुलै/ऑगस्ट २०२१ मध्ये होणाऱ्या (Second Term End Examination) परीक्षांसाठी आवेदनपत्र विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख खालील प्रमाणे कळविण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | परीक्षा (अभ्यासक्रमाचे नांव) | विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र दाखल करण्याचा अंतिम दिनांक | | महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा आवेदनपत्र दाखल करण्याचा अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|---|---|
| | | विहित शुल्कासह | विलंब शुल्कासह | विहित शुल्कासह | विलंब शुल्कासह |
| १ | बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. व इतर तत्सम पदवी अभ्यासक्रम | 03.06.2021 | 14.06.2021 | 24.06.2021 | 28.06.2021 |

तथापी, परीक्षा आवेदनपत्र महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये उशिराने प्राप्त होत आहे. सदर बाब विचारात घेता, विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात व महाविद्यालयांनी विद्यापीठात परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यासाठीची सुधारित तारीख वाढवून त्याखालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | परीक्षा (अभ्यासक्रमाचे नांव) | विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात परीक्षा आवेदनपत्र दाखल करण्याचा अंतिम दिनांक | | महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा आवेदनपत्र दाखल करण्याचा अंतिम दिनांक | |
|---|---|---|---|---|---|
| | | विहित शुल्कासह | विलंब शुल्कासह | विहित शुल्कासह | विलंब शुल्कासह |
| १ | बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. व इतर तत्सम पदवी अभ्यासक्रम | 28.06.2021 | 09.07.2021 | 14.07.2021 | 14.07.2021 |

उपरोक्त नमूद तारखेनंतर निर्धारित वेळापत्रकातील परीक्षा आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेव्यतिरिक्त इतर नियम जसेच्या तसे लागू राहातील.

**तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या निर्धारित वेळापत्रकामधील मुद्दा क्र. १२ नुसार सर्व बाबींची पूर्तता केल्यानंतर महाविद्यालय/परिसंस्थेच्या प्रतिनिधीमार्फत पाठविलेलीच परीक्षा आवेदनपत्रे विद्यापीठात स्विकारली जातील. विद्यापीठामध्ये व्यक्तिगतरित्या परीक्षार्थींकडून अर्ज स्विकारले जाणार नाहीत किंवा महाविद्यालये/परिसंस्थांनी परीक्षा आवेदनपत्र घेवून परीक्षार्थींना विद्यापीठात पाठवू नये. तसेच टपालाने पाठविलेली परीक्षा आवेदनपत्रे स्विकारली जाणार नाहीत किंवा त्याबाबतच्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.**

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Circular/Notice या सदराखाली प्रसिध्द करण्यात आले आहे.

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Examinations Aurangabad

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद
संदर्भ क्र.: परीक्षा व मूल्यमापन/समन्वय/२०२१/१३१४
दिनांक : १५.०६.२०२१

K.M.J.M. Washi Tq.Washi Dist.

संचालक
परीक्षा व मूल्यमाप मंडळ

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र(भारत)
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२१/1396

दिनांक : ०४.०२.२०२१

# परिपत्रक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

वाचा :
१) दिनांक ०८.०५.२०२० रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला समितीचा अहवाल.
२) विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ, विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेचे निर्णय
३) परीक्षा विभागाचे परिपत्रक संदर्भ क्र. प.मू.व.मं./समन्वय/२०२०/९५५ दि. २०.०५.२०२०
४) सुधारित परिपत्रक क्र.पमूवमं/समन्वय/२०२०/कोव्हीड दि. २०.०५.२०२०
५) शैक्षणिक विभागाचे दि. २३.०७.२०२० रोजीचे परिपत्रक
६) परीक्षा विभागाचे परिपत्रक संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/२०२०/१०३० दि. ३०.०७.२०२०

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रांच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, कोरोना (कोवीड-१९) विषाणुच्या प्रादुर्भावामुळे व तद्नुषंगाने झालेल्या टाळेबंदीमुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन करण्याकरिता मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय समितीच्या अहवालातील तरतुदींनुसार मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र.६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देणेबाबत कळविले आहे. त्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयात जे विद्यार्थी पूर्वीच्या सत्रात अनुत्तीर्ण किंवा ए.टी.के.टी. असतील त्यांना सुध्दा त्यांनी प्रवेश घेतलेल्या सत्राची व पूर्वीच्या सत्रातील अनुत्तीर्ण विषयाची परीक्षा देणेसाठी परवानगी देण्यात येत आहे.

तरी याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधीत अध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात व विद्यार्थ्यांना अडचणी निर्माण होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

उरोक्त प्रमाणे परीक्षा आवेदन पत्र भरण्याची परवानगी ही फक्त शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या वर्षासाठीच लागु राहील. तद्नंतर पुर्वीप्रमाणे परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्यात येतील याची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन वरीलप्रमाणे कार्यावाही करावी व विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे, ही विनंती.

K.M.J.M. Washi Dist.Osmanabad

संचालक
परीक्षा व मुल्यामापन मंडळ

Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Aurangabad-431004 Maharashtra (India)
NAAC Re-Accredited A

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ" दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
Director : (0240) 2403201
Office : (0240) 2403178/199
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac.
E-Mail : coe@bamu.ac.in

**Office of the Director**
**Board of Examinations & Evaluation**
कार्यालय, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ क्र परीक्षा/२०२१/ 642

दिनांक : ०१.१२.२०२१

# परिपत्रक

**प्रस्तावना :**

मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये परीक्षा व मूल्यमापन विभागात विद्यार्थी, पालक, महाविद्यालयाचे अधिकारी/कर्मचारी /प्रतिनिधी यांच्या सुविधाकरिता एक खिडकी योजना काऊंटर स्थापन करण्यात आलेले असून सदरील एक खिडकी योजनेमार्फत निकालासंबंधीच्या त्रुटी, राखीव असलेले निकाल जाहीर करणे तसेच विविध प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्र मागणी अर्ज स्वीकारणेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरील एक खिडकी योजनेच्या काऊंटरवर अर्ज / आवेदनपत्र सादर केल्यानंतर विद्यार्थी/पालक/महाविद्यालयाचे अधिकारी/कर्मचारी / प्रतिनिधी यांच्या मोबाईलवर मेसेजद्वारे लिंक उपलब्ध होऊन त्यानी अर्ज/आवेदनपत्र सादर केल्यानंतर अर्जावर कार्यालय करत असलेल्या / केलेल्या कार्यवाहीबाबतचा तपशिल लिंकद्वारे उपलब्ध होतो. एक खिडकी योजना काऊंटरवर अर्ज सादर केल्यानंतर संबंधितांच्या अर्जावर/आवेदनपत्रावर विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यास अथवा दिरंगाई झाल्यास विद्यापीठाच्या संकेतस्थळावर College student Grievance Redressal System ही पध्दत उपलब्ध आहे.

**परिपत्रक :**

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांच्या निकालासंदर्भातील त्रुटी, विद्यार्थ्यांच्या प्रलंबित कामांच्या तक्रारी त्यांना विद्यापीठास सादर करण्यात याव्यात याकरिता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर खालील प्रमाणे लिंकचा वापर करावा.

**<u>विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे लिंकमधील स्टेप प्रमाणे वापर करावा</u>**

http://online.bamu.ac.in/unic

↓

Select User

↓

Student

↓

College student Grievance Redressal System

↓

Open New Ticket

विद्यार्थ्यांनी वरील लिंकचा वापर केल्यानंतर त्यांना तक्रारीसंबंधीचे तिकीट नंबर उपलब्ध होईल, त्यानंतर तिकीट नंबरच्या आधारे विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यात येईल. यासाठी विद्यार्थी आहे त्या ठिकाणावरुन सदरील लिंकचा वापर करु शकतील व त्यांना त्यांच्या तक्रारीविषयी विद्यापीठात यावे लागणार नाही.

तिकीट नंबर प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या तक्रारीवर कार्यवाही करण्यात येऊन लिंकवर विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येईल.

करिता, वरील लिंकचा सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

या परिपत्रकाची माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
२. मा. प्र-कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
३. मा. कुलसचिव महोदयांचे स्वीय सहाय्यक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४. सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, विद्यापीठ परिसर व उपपरिसर, उस्मानाबाद
५. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
६. संचालक, युनिक, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
७. जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
८. उपकुलसचिव, परीक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रत :

१. सर्व कक्ष अधिकारी, परीक्षा विभाग
२. सर्व कर्मचारी, परीक्षा विभाग

K.M.J.M. Washi - 97 - Tq.Washi Dist.Osmanabad